मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# चांगले राजे,
# वाईट राजे

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Lazarus
रूपान्तरकार: Ruth Klassen
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मनश्शेसाठी तो दिवस दुःखाचा दिवस होता. त्याचे वडील हिज्कीया राजा नुकतेच मरण पावले होते. तो आता केवळ बारा वर्षांचा होता, आणि मनश्शे यहुदात देवाच्या लोकांवर नविन राजा झाला. त्यावेळी त्याला काहीही माहित नव्हते, परंतू येणाऱ्या ५५ वर्षे पर्यंत मनश्शे राजा राहणार होता. चांगला राजा बनण्यासाठी मनश्शेला देवाच्या मदतीची गरज होती.



परंतू मनश्शेने देवाकडे दुर्लक्ष करुन जे वाईट ते केले. मुर्तिपुजेसाठी मनश्शेने वेद्या बांधल्या. ऐवढेच नव्हे तर त्याने केलेली कोरीव मूर्ति त्याने परमेश्वराच्या मंदिरांत ठेविली ! देवाने मोशेच्याव्द्वारे असे म्हटले होते की, "तू आपल्यासाठी कोरीव मुर्ति करु नको व तिच्या पाया पडू नको."



मनश्शेने जादुटोणा आणि चेटुक
या गोष्टी केल्या. त्याने लोकांना
देवापासून दुर नेले. ऐवढेच नव्हे तर
राजाने त्याच्या लेकरांचा अग्नीत
होम करुन मुर्तिला अर्पण केले.
मनश्शेच्या आज्ञा भंगाने
परमेश्वराला फारच
क्रोधित केले.



जेंव्हा त्याच्या लोकांनी आज्ञा पाळल्या नाही, तेंव्हा देवाने त्यांना शिक्षेतून जाऊ दिले. मनश्शे आणि तो ज्या लोकांचा राजा होता त्यांच्याशी देखिल असेच घडले. परमेश्वराने त्यांच्यावर अश्शूरचे सैन्य पाठविले. मनश्शेला बाबेल देशात बंदि बनवून नेण्यात आले.





बाबेल देशात दुःखातून जात असतांना, मनश्शेने त्याचा देव परमेश्वर याची काकुळती केली. त्याच्या वडीलांच्या परमेश्वरासमोर त्याने स्वतःला अतिशय नम्र केले, आणि प्रार्थना केली. जीवन नसलेल्या मुर्तिंची पुजाअर्चा याच्यापुढे करायची नाही ! परंतू, त्याच्या या सर्व दुष्टपणा नंतर देखिल परमेश्वर त्याच्या प्रार्थनेचे उत्तर दईल का?

होय ! परमेश्वराने राजाची प्रार्थना ऐकली आणि त्याला यरुशलेमेत परत आणले, त्याच्या राजगादीवर परत आणले, त्या लोकांवर राज्य करावे म्हणून परत आणले. मनश्शेला कळून आले होते की प्रभू परमेश्वर हाच देव आहे.



मनश्शे राजा आता नविन व्यक्ति बनलेला होता. त्याने देवाच्या मंदिरातील कोरीव मुर्ति काढून टाकली तसेच यरुशलेमेतील सर्व परकीय दैवते गोळा केली. त्याने प्रभू परमेश्वरासाठी वेदी तयार केली आणि परमेश्वराला त्याने आभाराचे अर्पण केले. त्यानंतर त्याने इस्त्राएल लोकांना इस्त्राएलाचा प्रभू परमेश्वर याची भक्ति करण्याचा आदेश दिला.

मनश्शेत किती बदल झाला !



मनश्शे मरण पावल्यावर, त्याचा स्वतःचा मुलगा, आमोन, हा मुर्तिपुजेकडे परत गेला. परंतू मनश्शे प्रमाणे त्याने स्वतःला परमेश्वरासमोर नम्र केले नाही. अमोन अधिकाधिक पाप करित गेला, अखेरिस त्याच्या स्वतःच्या सेवकांनी त्याच्याच घरात त्याचा वध केला. त्याने केवळ दोन वर्षे राज्य केले.



त्यानंतरचा राजा, योशीया केवळ आठ वर्षाचा होता. त्याने ३१ वर्षे राज्य केले आणि परमेश्वराच्या दृष्टिने जे योग्य ते त्याने केले. त्याने सर्व खोटी भक्तिस्थाने आणि खोटी दैवते यांचा नाश केला. खरेतर योशीयाने सर्व मुर्तिंचा चुरा केला.



चांगला राजा योशिया, याने देवाच्या मंदिराचे शुध्दीकरण करुन त्याची डागडुजी केली. मंदिरातील टाकाऊ सामानात मंदिराच्या एका याजकाला देवाने मोशेला दिलेल्या नियशास्त्राचा एक ग्रंथ सापडला.



राजाने जेंव्हा नियमशास्त्रातील
लिखाण ऐकले, तेंव्हा त्याने
दुःखाने त्याचे कपडे फाडले.
देवाच्या नियमशास्त्राचे
आज्ञाउंल्लघन करण्याच्या
बाबतीत त्याचे पुर्वज किती दुष्ट
होते ते योशियाला माहित होते.



हुल्दा नावाच्या संदेष्ट्रीने योशीयाला देवाचा संदेश कळविला. "पाहा, या ग्रंथात सांगितलेले सर्व अनिष्ट मी या स्थानावर व प्रजेवर आणीन कारण त्यांनी मला सोडले आहे ". परंतू योशीया माझ्यासमोर नम्र झाला व त्याने आज्ञापालन केले म्हणून तो जिवंत राहिल तोवर मी हे होऊ देणार नाही.



त्याच्या लोकांना परत प्रभू परमेश्वराकडे नेण्यासाठी देवाने योशीयाचे सहाय्य केले. एके दिवशी, युध्द् भूमिवर त्याच्या सैन्यांचे नेतृत्व करुन युध्द् करित असतांना शत्रूंच्या तिरंदाजांनी योशीया राजाला घायाळ केले. त्याच्या सेवकांनी रथातून त्याला यरुशलेमात नेले तेथे तो मरण पावला. त्याच्या सर्व लोकांनी त्याच्यासाठी शोक केला आणि चांगला राजा योशीया याच्यासाठी त्यांनी एक गित तयार केले.





लवकरच राज्याचा अंत झाला.
परंतू कधितरी, इस्त्राएलवर
पुन्हा एक राजा राज्य करिल.
"राजांचा राजा आणि प्रभूंचा
प्रभू" असे त्याचे नाव आहे.
पहिल्या वेळेस जेंव्हा प्रभू येशू
आला तेंव्हा त्याला धिक्कारुन
वधस्तंभावर खिळण्यात आले.
जेंव्हा प्रभू येशूचे पुनरागमन
होईल तेंव्हा तो केवळ
इस्त्राएलवरच राज्य करणार
नाही तर संपूर्ण जगावर राज्य
करणार आहे.

# चांगले राजे, वाईट राजे

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

२ इतिहास ३३-३६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16